## दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,
## येरवडा,पुणे-४११००६




## प्रस्तावना

मुंबई तुरुंग सुधारणा समिती १९४६ च्या  शिफारशीनुसार कारागृह अधिका-यांना आणि सुरक्षा कर्मचा-यांना सुधारकामांच्या सर्व क्षेत्रातील शास्त्रीय आधारावरील आणि प्रायोगिक प्रशिक्षण देण्यासाठी १९५५ मध्ये येरवडा, पुणे-६ येथे तुरुंग अधिकारी प्रशिक्षण शाळा, स्थापन करण्यात आली. सदर प्रशिक्षण संस्थेवर अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह या दर्जावरील अधिकारी यांची प्राचार्य, म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्यांना तुरुंगाधिकारी श्रेणी-१, श्रेणी-२ निर्देशक आणि लिपीक संवर्गीय कर्मचा-यांचे सहाय्य मिळते. पुणे विद्यापीठ इतर संबंधित संस्थेतील तज्ञ प्राध्यापक वर्गास आमंत्रित केले जाते त्यांच्याकडून कायदा, सामान्य प्रशासन, समाजशास्त्र, सामाजिक व्यक्ती कार्यतंत्र आणि समुह कार्यपध्दती इत्यादी विषयावर व्याख्याने दिली जातात.

कारागृह अधिका-यांचा हा अभ्यासक्रम एक वर्षाचा असतो. हे प्रशिक्षण अशा रितीने दिले जाते की, गुन्हेगारी शास्त्र आणि इतर समाजशास्त्र यांची पुरेशी माहिती आणि कारागृह व्यवस्थापनातील प्रत्यक्ष अनुभव मिळेल. तसेच तुरुंग प्रशासनाच्या प्रत्येक शाखेतील प्रत्यक्ष कामाची माहिती देण्यावर भर दिला जातो. प्रशिक्षणार्थी अधिका-यांना दुस-या राज्यात सुधार संस्थांच्या अभ्यास दौ-यासाठी पाठविण्यात येते. कारागृह शिपाई, यांना सेवांतर्गत प्रशिक्षणाचा ३ महिण्यांचा उजळणी पाठयक्रम आणि नव्याने भरती झालेल्या कारागृह शिपाई यांचेसाठी कारागृह व्यवस्थापनातील पाच महिण्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात येतो. यानंतर परिक्षा घेण्यात येते आणि सर्वसाधारणपणे जे अधिकारी/कर्मचारी या परिक्षेत पास होतात त्यांनाच सेवेत कायम ठेवले जाते.

## नामकरण

तुरुंग अधिकारी प्रशिक्षण शाळा, येरवडा, पुणे-६ ह्या संस्थेची स्थापना जुन-१९५५ साली करण्यात आलेली असून या संस्थेचे दिनांक १६ ऑगस्ट २००३ रोजी दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे-६ असे नामकरण करण्यांत आलेले आहे.



## प्रशिक्षणाचा उददेश

कारागृह विभागाचा कार्यात्मक अभ्यास, विविध विषयावर सुधारीत नियमानूसार कार्यशाळा आयोजित करणे, विभागाशी संबंधित विषयाचे प्रशिक्षण देणे, कारागृह प्रशासनातील आवश्यक गोष्टींची आणि सुधार प्रशासनाच्या शास्त्रीय व प्रगतशील प्रगतीची प्रशिक्षणार्थी अधिकारी/कर्मचारी यांना ओळख करुन देणे, अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदारी, कर्तव्याची माहिती उपलब्ध करुन देणे, तसेच कारागृह विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी सक्षम बनविणे हा प्रमुख उद्देश आहे.

## प्रशिक्षण

**१) आंतरवर्ग (Indoor ):-अधिकारी यांचेसाठी**:- गुन्हेगारी शास्त्र,अन्यायग्रस्त शास्त्र, शिक्षा शास्त्र, परिविक्षण पूर्नवसन, मानसशास्त्र, समाजशास्त्र व समाजकार्य, भारतीय राज्य घटना आणि मानवी हक्क, गुन्हेगारी कायदा, व्यवस्थापनाची तत्वे, प्रशासनासंबंधी नियम, महाराष्ट्र कारागृह नियमावली, कार्यालयीन कार्यपध्दत आणि सेवा विषयक बाबी, सुधार प्रशासन इत्यादी विषयावर आंतरवर्गात प्रशिक्षण दिले जाते

## विशेष व्याख्याने व प्रशिक्षण

पोलीस विभागाची माहिती, फिंगर प्रिंट बाबत माहिती, न्यायवैद्यक शास्त्र, फॉरेन्सीक बाबत माहिती, अंमली पदार्थाची ओळख व माहिती, सायबर क्राईम बाबत माहिती, न्यायालयाचे प्रकार व न्यायालयीन कामकाज, निविदा पध्दती, विभागीय चौकशी, वित्तीय नियमावली, हस्ताक्षर कार्यशाळा, व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा, जेन्डर सेन्सीटीव्हीटी कार्यशाळा, समुपदेशन कार्यशाळा, व्यवस्थापन शास्त्राद्वारे कार्यक्षमता वाढविणे, गुप्तवार्ता विभाग कार्यशाळा व आपत्ती व्यवस्थापन, तसेच पुस्तक निरीक्षण (Book Reviev ), व्यक्तीगत प्रकल्प, सामुदिक प्रकल्प, इत्यादी.

**२) कारागृह शिपाई:**-सुधार प्रशासन, भारतीय राज्य घटना, बंधाचे मानवी हक्क, सुरक्षा व्यवस्थापन, सेवाविषयक नियम, सामान्य ज्ञान, विशेष उपक्रम, प्रशासनासंबंधी नियम, महाराष्ट्र कारागृह नियमावली भाग-१, इत्यादी विषयावर अंतरवर्गात प्रशिक्षण दिले जाते.

**ब) मैदानी प्रशिक्षण(Out door):**-पदकवायत, लाठी कवायत, केन कवायत, किर्च कवायत, मॉब डिस्पर्सल, नेतृत्व, संचलन, शस्त्र कवायत, रायफल व पिस्तोल प्रशिक्षण, शारिरीक कवायत, फ्री स्टॅन्डींग एक्सरसाईज,

मेडिसिन बॉल, लॉग एक्सरसाईज, सामुहीक कवायत इत्यादी तसेच राष्ट्रीय फिल्म संग्रहालय, थियटर क्लब, स्पोर्ट क्लब, ट्रेकिंग क्लब यांचे सदस्यत्व इत्यादी

**क) इतर प्रशिक्षण:-**अडथळे पार करणे, कराटे, ऑपरेटर्स वर्क, दोर चढणे, बीम, सुर्य नमस्कार, योगासने ,घोडा, फ्रंटरोल/बॅकरोल वेग-वेगळे खेळ, मनोरंजन ( नाटक,एकांकिका,) वेग-वेगळया विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करणे, बीपीआर ॲन्ड डी नवी दिल्ली व कारागृह विभाग यांचे वतीने वेग वेगळया विषयावर विशेष प्रशिक्षण आयोजित केले जाते. तसेच नागरी संरक्षण दलाचे प्रशिक्षणही आयोजीत करण्याची कार्यवाही केली जाते.

## भोजन व्यवस्था

प्रशिक्षणार्थी यांचेकरिता भोजन व्यवस्था ही  कारागृह कर्मचारी भवन येथे केली जाते. जेवण बनविण्यासाठी कायमस्वरुपी स्वयंपाकी (कुक ) यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदरची मेस ही प्रशिक्षणार्थी यांचे वर्गणीतून ना नफा ना तोटा या बेसवर चालविली जाते. त्यासाठी प्रशिक्षणार्थी यांची खर्चासाठी कमिटीची नेमणूक करण्यात आली आहे.

## प्रशिक्षणार्थी निवास व्यवस्था

या प्रशिक्षण सर्व प्रशिक्षणार्थी यांना मोफत राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

## ग्रंथालय

प्रशिक्षण संस्थेत अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षणार्थी यांना अंतरवर्गातील अभ्यासवर्गाचे प्रशिक्षण देणेसाठी अभ्यासक्रमानुसार मोफत पुस्तके उपलब्ध करुन देणे बाबतची कार्यवाही ग्रंथालयातून केली जाते. या प्रशिक्षण संस्थेत वेग-वेगळया प्रकारची ४६५८ इतकी पुस्तके उपलब्ध आहेत.

## आस्थापना

दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे-६ या आस्थापनेवर खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांची पदे मंजूर आहेत.

| अ.क्रं. | पदनाम | मंजूर पदे | अ.क्रं. | पदनाम | मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्राचार्य | ०१ | ०२ | अधि.जि.का.वर्ग-१ | ०१ |
| ०३ | प्रशासन अधिकारी | ०१ | ०४ | तुरुंगाधिकारी श्रेणी-१ | ०३ |
| ०५ | प्रशि.तुरुंगाधिकारी श्रेणी-२ | ५० | ०६ | तुरुंगाधिकारी श्रेणी-२ | ०३ |
| ०७ | वरिष्ठ लिपीक | ०२ | ०८ | लिपीक | ०१ |
| ०९ | सुभेदार | ०३ | १० | कारागृह हवालदार | ०८ |
| ११ | कारागृह शिपाई | १४ | १२ | स्वयंपाकी | ०२ |
| १३ | स्वयंपाकी मदतनीस | ०४ | | **एकूण:-** | **९३** |

## अभ्यास भेट

**१) स्थानिक भेटी:-** प्रशिक्षणार्थी अधिकारी/कर्मचारी यांना ज्या संस्थेशी कारागृह प्रशासनाचा संबंध येतो अशा मनोरुग्णालय, अग्निशामक दल, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधीनी, राज्य राखीव पोलीस दल इत्यादी ठिकाणी स्थानिक भेटी आयोजित केल्या जातात.

**२) राज्यस्तरीय भेटीः-** कारागृह विभागातील वेग-वेगळया प्रकारची उदा मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह, विशेष कारागृह, खुले जिल्हा कारागृह, खुली वसाहत, किशोर सुधारालय, महिला कारागृहांची अभ्यास भेटी प्रशिक्षणाच्या कालावधीत आयोजित करण्याची कार्यवाही केली जाते.

**३) राष्ट्रीय स्तरावरील भेटीः-**कारागृह अधिकारी ( उपअधिक्षक, मध्यवर्ती कारागृह/तुरुंग अधिकारी, श्रेणी-२ ) यांचे करिता राष्ट्रीय स्तरावरील इतर राज्यामधील कारागृह व्यवस्थापन कशा स्वरुपाचे आहे. याचा अभ्यास दौ-यात, अभ्यास करण्यात येतो.

## <u>आजपर्यंत देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा तपशिल</u>

कारागृह विभागातील आजपर्यंत एकूण २८ उपअधिक्षक, ६५८ तुरुंगाधिकारी श्रेणी-२ व ५९६३ कारागृह शिपाई यांना प्रशिक्षण देण्यात आले असून सध्या तुरुंगाधिकारी श्रेणी-२ तुकडी क्रं.५६ (माहे डिसेंबर २०१२ ते माहे डिसेंबर २०१३ ) मध्ये ४१ तुरुंगाधिकारी श्रेणी-२ व कारागृह शिपाई तुकडी क्रं.१०१ ( माहे मे २०१३ ते माहे सप्टेंबर २०१३ ) मध्ये ७९ कारागृह शिपाई यांचे प्रशिक्षण सुरु आहे.

*****************************************************************